दै. गोदातीर दि. ०५.०४.२५

# नांदेड शहरातील सर्वच ठाण्यात पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन!

## ७ वाहनांसह ६५ शस्त्र जप्त, २०० गुन्हेगारांच्या घरांची झाडाझडती

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी काळातील सण, उत्सव शांततेत पार पडावीत, यासाठी पोलीस सतर्क झाले आहेत. या अनुषंगाने जिल्हा पोलिस दलाच्यावतीने दि. ३ एप्रिल रोजी पहाटेपासून शहरातील ६ पोलीस ठाण्यातंर्गत कोम्बिंग आणि सर्च ऑपरेशन राबविण्यात आले. यात ६ दुचाकी, १ चारचाकी वाहनांसह ६५ धारधार शस्त्र जप्त करण्यात आले आहे. तर या कारवाईत २०० आरोपींच्या घरांची झाडाझडती घेण्यात आली. ही कारवाई पुढे सुरूच राहणार, अशी माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली.



नांदेड जिल्हा पोलीस दलाकडून वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना पाबंद करण्यासाठी शहरासह जिल्ह्यात दरमहा मोहीम राबविली जात आहे. गुरुवारी पहाटे शहरात अशीच मोहिम राबविण्यात आली. एप्रिलच्या महिन्यात विविध सण, उत्सवाची मोठी रेलचेल असते. रामनवमीसह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, हनुमान जयंती, महावीर जयंती, गुड फ्रायडे असे विविध सण, उत्सव साजरे केले जाणार आहेत. या कालावधीत जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस दल सतर्क झाले आहे. या अनुषंगाने पोलिस दलाकडून वेगवेगळ्या खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. या अंतर्गत बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा शांतता समितीची बैठकही घेण्यात आली. या बैठकीत वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या. या बैठकीनंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या नेतृत्वाखाली गुरूवारी पहाटेपासून दुपारी १२ वाजेपर्यंत शहरात कोंबिंग आणि ऑपरेशन राबविण्यात आले. शहरातील सहा ठाणे हद्दीत हे ऑपरेशन राबवण्यात आले. या कारवाईत ६ दुचाकी, १ चारचाकी वाहनांसह ६५ जप्त धारधार शस्त्र जप्त करण्यात आले आहे. तर या कारवाईत २०० आरोपींच्या घरांची झाडाझडती घेण्यात आली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून अनेक जण भूमिगत झाले आहेत.

या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, ४ आरसीपी प्लाटूनसह होमगार्ड, पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते. या ऑपरेशन दरम्यान शस्त्र बनविणारा कारखाना उद्धवस्त, हरणाची शिंगे जप्त करण्यात आले.

कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान ग्रामीण पोलिसांनी ३९ ठिकाणी छापे मारून मारले आहेत. यात तलवारी, खंजीर बनवणारा कारखाना उद्धवस्त करण्यात आला आहे. आरोपीकडून १ चारचाकी व ४ दुचाकी जप्त करण्यात करण्यात आल्या असून हरणाची शिंगही ताब्यात घेण्यात आली आहेत, अशी माहितीही मिळाली. तर ही कारवाई सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे करता आली, असे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सांगितले.

६५ धारदार शस्त्र जप्त करण्यात आले असून या प्रकरणी शहरातील वेगवेगळ्या ठाण्यात १५ गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. याच वेळी रेकॉर्डवरील २०० आरोपींची तपासणी तसेच त्यांच्या घरांची झाडाझडती घेण्यात आली. पुढे ही मोहिम सुरूच राहिल, असे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सांगितले.